SAMPLE CONTENT

PRECISE

# भूगोल

पाठ्यपुस्तक व बोर्डाच्या कृतिपत्रिका आराखड्यावर आधारित





मेघना जाधव
M.A., M.Ed., SET (Edu., Geog.)


इयत्ता
## दहावी
(मराठी व सेमी इंग्रजी माध्यम)


Published by:
LAZY BONE EDUCATION

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे – ०४
यांच्याद्वारे नियोजित अद्ययावत प्रश्नपत्रिका आराखड्यावर आधारित

# Precise भूगोल

## इयत्ता दहावी

### ठळक वैशिष्ट्ये

- ☞ अद्ययावत प्रश्नपत्रिका आराखड्यावर आधारित.
- ☞ एका दृष्टिक्षेपात पाठाचा परिपूर्ण आढावा.
- ☞ अद्ययावत प्रश्नपत्रिका आराखड्यानुसार प्रश्नांची मांडणी.
- ☞ पाठाधारित, पाठांतर्गत व पाठ्येतर प्रश्नांचा समावेश.
- ☞ मार्च २०२२ पर्यंतच्या बोर्ड प्रश्नपत्रिकेतील निवडक प्रश्नांचा समावेश.
- ☞ आकलनाकरता नकाशा व आलेखांवर आधारित प्रश्नांचा समावेश.
- ☞ ज्ञानवर्धक व रंजक माहिती देणारा 'ज्ञानगुरू (**GG**)' अंतर्भूत.

नकाशावाचनाकरता मार्गदर्शनपर, उत्तरपत्रिकेचे सादरीकरण आणि मॉडेरेटर टिप्स (भारत आणि ब्राझीलची राज्ये स्मरणात ठेवण्यात साहाय्यभूत व्हिडिओ समाविष्ट) संबंधित व्हिडिओज **Q. R. Code** मार्फत उपलब्ध.

Sample Content

Printed at: **Print to Print,** Mumbai

© *Lazy Bone Education*
*No part of this book may be reproduced or transmitted in any form or by any means, C.D. ROM/Audio Video Cassettes or electronic, mechanical including photocopying; recording or by any information storage and retrieval system without permission in writing from the Publisher.*

P.O. No. 5573

TEID: 2375

# प्रस्तावना

नमस्कार विद्यार्थी मित्रांनो,

'महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक मंडळ' निर्मित भूगोल पाठ्यपुस्तकामध्ये भारत व ब्राझील या देशांविषयक माहितीची मांडणी भौगोलिक घटकांच्या अनुषंगाने केली आहे. जेणेकरून दोन घटकांतील साधर्म्य व वेगळेपणा चिकित्सकपणे अभ्यासून तौलनिक दृष्टिकोन विकसित होण्यास निश्चितपणे मदत होईल. अशा या ज्ञानरचनावादी अभ्यासक्रमावर आधारित **लेझी बोन एज्युकेशनचे Precise भूगोल इयत्ता दहावी** हे पुस्तक प्रकाशित करताना आम्हांला आनंद होत आहे.

पाठाचा परिचय आकृतिबंध, तक्ता व ओघतक्ता यांस्वरूपात करून देण्यात आला आहे. पाठाच्या ओघानुसार प्रश्नांची क्रमवार मांडणी हे आमच्या पुस्तकांचे वेगळेपण आहे. अद्ययावत प्रश्नपत्रिका आराखड्यानुसार सर्व प्रकारच्या प्रश्नांची रचना केलेली आहे. स्वाध्यायातील सर्व प्रश्नांची मुद्देसूद उत्तरे दिली आहेत. त्याचबरोबर प्रत्येक पाठाचा बारकाईने अभ्यास करून आलेख, नकाशे यांसह प्रश्नांची सुलभ मांडणी केली असून संपूर्ण पाठाच्या आकलनासाठी अधिकचे वैविध्यपूर्ण प्रश्नदेखील दिले आहेत. पाठामध्ये विचारलेल्या 'नकाशाशी मैत्री', 'सांगा पाहू', 'शोधा पाहू', 'पाहा बरे जमते का?', 'जरा विचार करा', 'जरा डोके चालवा' या शीर्षकांखालील प्रश्नांचे प्रश्नपत्रिकेतील प्रश्नप्रकारांनुसार वर्गीकरण करून त्यांची मुद्देसूद आणि सोदाहरण उत्तरे दिली आहेत. 'ज्ञानाचे उपयोजन करा' या शीर्षकाखाली पाठांतर्गत प्रश्नांचा समावेश केला आहे. परीक्षेच्या दृष्टीने विषयाचा सराव व तयारी व्हावी याकरता मार्च २०१९, डिसेंबर २०२० व मार्च २०२२ बोर्ड प्रश्नपत्रिकेतील प्रश्नांचा समावेश करण्यात आला आहे.

विद्यार्थ्यांना नकाशावाचनाकरता मार्गदर्शनपर, तसेच उत्तरपत्रिकेचे सादरीकरण आणि मॉडेरेटर टिप्स संबंधित व्हिडिओज **Q. R. Code** मार्फत दिले आहेत. तसेच 'ज्ञानाचे उपयोजन करा' या शीर्षकाखाली पाठांतर्गत प्रश्नांची उत्तरे आवश्यकतेनुसार **Q. R. Code** द्वारे देण्यात आली आहेत.

या पुस्तकाच्या अभ्यासाने विद्यार्थ्यांची भूगोल विषयातील रुची वाढेल, असा आम्हांला विश्वास वाटतो.

हे पुस्तक परिपूर्ण होण्यासाठी आम्ही सर्वतोपरी प्रयत्न केले आहेत. पुस्तकाची उत्कृष्टता अधिकाधिक वाढावी याकरता आपल्या सूचना व प्रतिक्रिया नेहमीच स्वागतार्ह आहेत. आपला अभिप्राय पुढील इ-मेल पत्त्यावर पाठवू शकताः support@lazybone.in

**चला भूगोल शिकूया, निसर्गाकडे नव्या दृष्टीने पाहूया!**

**ज्ञानार्थींना मनःपूर्वक शुभेच्छा!**

प्रकाशक

**आवृत्तीः** तृतीय

## ज्ञानगुरू (GG)




**ज्ञानगुरू** नावाचा एक खास मित्र आम्ही तुमच्या भेटीस घेऊन येत आहोत. हा तुमचा लाडका मित्र बनून या पुस्तकात तुम्हांला भेटेल. जो आपल्या माहितीद्वारे तुमचे ज्ञान वाढवण्यास व संकल्पना स्पष्ट करण्यास मदत करेल. ज्ञानाची आपल्या जीवनाशी सांगड घालता यावी यासाठी आम्ही केलेला हा एक प्रयत्न आहे. यामुळे, तुम्हांला ज्ञानाचे व्यावहारिक उपयोजन करणे सुलभ होईल.

हा नवीन मित्र तुम्हांला नक्कीच आवडेल.


Sample Content



**Disclaimer**

This reference book is transformative work based on 'भुगोल; तिसरे पुनर्मुद्रण: २०२२' published by the Maharashtra State Bureau of Textbook Production and Curriculum Research, Pune. We the publishers are making this reference book which constitutes as fair use of textual contents which are transformed by adding and elaborating, with a view to simplify the same to enable the students to understand, memorize and reproduce the same in examinations.

This work is purely inspired upon the course work as prescribed by the Maharashtra State Bureau of Textbook Production and Curriculum Research, Pune. Every care has been taken in the publication of this reference book by the Authors while creating the contents. The Authors and the Publishers shall not be responsible for any loss or damages caused to any person on account of errors or omissions which might have crept in or disagreement of any third party on the point of view expressed in the reference book.

© reserved with the Publisher for all the contents created by our Authors.

No copyright is claimed in the textual contents which are presented as part of fair dealing with a view to provide best supplementary study material for the benefit of students.

# ठळक वैशिष्ट्ये

### प्रश्नपत्रिका आराखडा
विद्यार्थ्यांना प्रश्नपत्रिकेचे स्वरूप स्पष्ट व्हावे, याकरता अद्ययावत प्रश्नपत्रिका आराखडा देण्यात आला आहे.

### विविध प्रश्नप्रकार अंतर्भूत
१. संपूर्ण पाठ बोर्डाच्या अद्ययावत प्रश्नपत्रिका आराखड्यानुसार प्रश्नोत्तराच्या स्वरूपात मांडण्यात आला आहे.

### नकाशावर आधारित प्रश्न
१. बोर्डाच्या प्रश्नपत्रिका आराखड्यानुसार प्रश्न क्र. ४ (अ) साठी प्रत्येक पाठात भारत आणि ब्राझील संबंधित नकाशांचा समावेश केला आहे.
२. प्रश्न क्र. ४ (आ) मध्ये नकाशासंबंधित पाठांतर्गत प्रश्नांव्यतिरिक्त अधिकच्या प्रश्नांचा समावेश केला आहे.
३. याशिवाय नकाशावाचनासंबंधित मार्गदर्शनपर व्हिडिओ Q. R. Code मार्फत उपलब्ध करून दिला आहे. यामुळे विद्यार्थ्यांचा नकाशा भरणे व नकाशा वाचन करणे यांचा परिपूर्ण सराव होईल.

### सविस्तर उत्तरे लिहा.
१. प्रश्न क्र. ७ 'सविस्तर उत्तरे लिहा.' मधील प्रश्नांची उत्तरे मुद्द्यांच्या स्वरूपात देण्यात आली आहेत. तसेच विद्यार्थ्यांना उत्तर लक्षात ठेवण्यास मदत व्हावी यासाठी उत्तरातील महत्त्वाचे शब्द ठळक करण्यात आले आहेत.
२. या प्रश्नाच्या उत्तराच्या उत्तम सादरीकरणासाठी नकाशा आराखड्याचा उपयोग कसा करावा याकरता मार्गदर्शनपर व्हिडिओ Q. R. Code मार्फत उपलब्ध करून देण्यात आला आहे.

### पाठांतर्गत प्रश्न
'ज्ञानाचे उपयोजन करा' या शीर्षकांतर्गत पाठांतर्गत विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे आवश्यकतेनुसार Q. R. Code मार्फत देण्यात आली आहेत.

### पाठाचा परिचय
१. पाठाचा परिचय मुद्दे व तक्ता या स्वरूपात देण्यात आला आहे.
२. भारतातील राज्ये व केंद्रशासित प्रदेश या विषयी अद्ययावत माहितीचा समावेश केला आहे.

### बोर्ड प्रश्नपत्रिकेतील प्रश्न
मार्च २०१९, डिसेंबर २०२० आणि मार्च २०२२ च्या बोर्ड परीक्षेत विचारलेल्या प्रश्नांचा समावेश यात करण्यात आला आहे.

### आलेखावर आधारित प्रश्न
विद्यार्थ्यांना आलेखासंबंधित सराव व्हावा याकरता प्र. ६ अ आणि आ हे प्रश्न आवश्यकतेनुसार पाठांत देण्यात आले आहेत.

### ज्ञानगुरू
आशयासंबंधित अधिकची माहिती देणारा ज्ञानगुरू समाविष्ट करण्यात आला आहे.

### मॉडरेटर टिप्स
परीक्षेच्या दृष्टीने संपूर्ण तयारी व्हावी याकरता मार्गदर्शनपर Q. R. Code व्हिडिओ देण्यात आला आहे.

Sample Content

# अद्ययावत प्रश्नपत्रिका आराखडा

**इयत्ता दहावी: भूगोल**

**वेळ: २ तास** **एकूण गुण: ४०**

| प्र.क्र. | प्रश्न | पर्याय | गुण | विकल्पांसह एकूण गुण |
|---|---|---|---|---|
| प्र.१. | अचूक पर्याय निवडा व विधाने पुन्हा लिहा. | ४ | ४ | ४ |
| प्र.२. | योग्य जोड्या जुळवा. | ४ | ४ | ४ |
| प्र.३. | एका वाक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही चार) | ५ | ४ | ५ |
| प्र.४. | अ. नकाशात माहिती भरा व सूची तयार करा. (कोणतेही चार) | ६ | ४ | ६ |
| | आ. नकाशा पाहून उत्तरे द्या. (कोणतेही चार) | ५ | ४ | ५ |
| प्र.५. | भौगोलिक कारणे सांगा. (कोणतेही दोन) | ४ | ६ | १२ |
| प्र.६. | अ. आलेख / आकृती काढा व उत्तरे द्या.<br>किंवा<br>आ. आलेख / आकृतीचे वाचन करा व उत्तरे द्या. | २ | ६ | १२ |
| प्र.७. | सविस्तर उत्तरे लिहा. (कोणतेही दोन सोडवा.) | ३ | ८ | १२ |
| | **एकूण गुण** | | **४०** | **६०** |

[**टीप:** १. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे – ०४
२. प्रश्न क्र. १ ते ३ मध्ये अन्य प्रकारच्या वस्तुनिष्ठ प्रश्नांचा समावेश असू शकतो.]

प्र.क्र.७ च्या उत्तरांमध्ये नकाशा स्टेन्सिलचा वापर करण्याकरता मार्गदर्शनपर व्हिडिओ पाहण्यासाठी Q. R. Code *Quill - The Padhai App* द्वारे स्कॅन करा.

बोर्डाची प्रश्नपत्रिका सोडवण्याकरता ‘मॉडरेटर टिप्स’ हा मार्गदर्शनपर व्हिडिओ पाहण्यासाठी Q. R. Code *Quill - The Padhai App* द्वारे स्कॅन करा.

नकाशावाचनाकरता मार्गदर्शनपर व्हिडिओ पाहण्यासाठी Q. R. Code *Quill - The Padhai App* स्मार्टफोनद्वारे स्कॅन करून पाहावा.

Sample Content

# अनुक्रमणिका


| क्रमांक | पाठाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | क्षेत्रभेट | १ |
| २ | स्थान - विस्तार | ८ |
| ३ | प्राकृतिक रचना व जलप्रणाली | १८ |
| ४ | हवामान | ४४ |
| ५ | नैसर्गिक वनस्पती व प्राणी | ५८ |
| ६ | लोकसंख्या | ७३ |
| ७ | मानवी वस्ती | ८७ |
| ८ | अर्थव्यवस्था आणि व्यवसाय | १०२ |
| ९ | पर्यटन, वाहतूक आणि संदेशवहन | १२३ |


**[टीपः पाठाखाली दिलेले प्रश्न * या चिन्हाने दर्शवले आहेत.]**


बोर्डाच्या परीक्षेला आत्मविश्वासाने सामोरे जाण्यासाठी नमुना प्रश्नपत्रिका सोडवणे हा एक उत्तम मार्ग आहे. शेजारील Q. R. Code स्कॅन करून आमच्या **‘SSC 54 प्रश्नपत्रिका व कृतिपत्रिका उत्तरपत्रिकांसहित’** याविषयी जाणून घ्या.

शेवटच्या क्षणी संपूर्ण पुस्तकाचा अभ्यास करणे अवघड वाटते का?
आमच्या **‘Important Question Bank (IQB)’** या पुस्तकातून महत्त्वाच्या प्रश्नांची झटपट उजळणी करा. अधिक माहितीकरिता पुढील Q. R. Code स्कॅन करा.

तुम्हाला माहित आहे का? बोर्डाच्या परीक्षेत भूगोल विषयात ४० गुणांपैकी तब्बल १४ गुणांचे प्रश्न नकाशा आणि आलेख यावर आधारित असतात.
हे गुण पैकीच्या पैकी मिळवण्यासाठी पुढील Q. R. Code स्कॅन करून **‘भूगोल नकाशा व आलेख सराव पुस्तिका’** हे पुस्तक लगेच मिळवा.


Sample Content

Sample Content

# २ स्थान - विस्तार

## पाठाचा परिचय

ब्राझील आणि भारत या देशांची तौलनिक माहिती

| देशाचे नाव | भारतीय प्रजासत्ताक | ब्राझील प्रजासत्ताक संघराज्य |
|---|---|---|
| **राजधानी आणि एकूण राज्य** | नवी दिल्ली (२८ राज्ये, ८ केंद्रशासित प्रदेश) ★ | ब्राझीलिया (२६ राज्ये, १ सांघिक जिल्हा Federal District) |
| **गोलार्धांनुसार स्थान** | हा देश उत्तर आणि पूर्व गोलार्धात आहे. | या देशाचा काही भाग उत्तर गोलार्धात व बहुतांश भाग दक्षिण गोलार्ध व पश्चिम गोलार्धात आहे. |
| **खंडांनुसार स्थान** | हा देश आशिया खंडात दक्षिणेस वसला आहे. | हा देश दक्षिण अमेरिका खंडात उत्तरेस वसला आहे. |
| **अक्षवृत्तीय आणि रेखावृत्तीय विस्तार** | ८° ४′ उ. ते ३७° ६′ उ. अक्षवृत्त आणि ६८° ७′ पू. ते ९७° २५′ पू. रेखावृत्त भारताच्या मध्यातून कर्कवृत्त (२३° ३०′ उत्तर अक्षवृत्त) गेले आहे. | ५° १५′ उ. ते ३३° ४५′ द. अक्षवृत्त ३४° ४५′ प. ते ७३° ४८′ प. रेखावृत्त ब्राझीलच्या उत्तर व दक्षिणभागातून अनुक्रमे विषुववृत्त (०° अक्षवृत्त) व मकरवृत्त (२३° ३०′ दक्षिण अक्षवृत्त) गेले आहे. |
| **स्वातंत्र्यपूर्व राजवट** | सुमारे दीड शतक इंग्रजांची राजवट | तीन शतकांहून अधिक काळ पोर्तुगिजांची राजवट |
| **स्वातंत्र्य दिन** | १५ ऑगस्ट १९४७ | ७ सप्टेंबर १८२२ |
| **शासनप्रणाली** | संसदीय प्रजासत्ताक शासनप्रणाली | राष्ट्रपती नियंत्रित प्रजासत्ताक शासनप्रणाली |
| **शेजारील देश** | पाकिस्तान, अफगाणिस्तान, चीन, नेपाळ, भूतान, बांग्लादेश, म्यानमार, श्रीलंका, इंडोनेशिया | पेरू, कोलंबिया, व्हेनेझुएला, गियाना, सुरीनाम, फ्रेंच गियाना, उरुग्वे, अर्जेंटिना, पॅराग्वे, बोलिव्हिया. |
| **सागर सान्निध्य** | अरबी समुद्र, बंगालचा उपसागर, हिंदी महासागर | उत्तर अटलांटिक महासागर, दक्षिण अटलांटिक महासागर |
| **प्रमुख वैशिष्ट्ये** | जगात लोकसंख्येच्या दृष्टीने दुसरा क्रमांक, लोकसंख्येत तरुणाईचे प्रमाण अधिक असल्याने तरुण देश म्हणून परिचित, मसाल्याच्या पदार्थांसाठी जगप्रसिद्ध, लोकप्रिय खेळ – क्रिकेट | सांबा नृत्य, जगाचा कॉफी पॉट, जगाच्या आर्थिक विकासाला हातभार लावणारा आणि भविष्यातील एक प्रमुख बाजारपेठ, लोकप्रिय खेळ - फुटबॉल |

★ **[टीप:** भारतीय संसदेमध्ये 'दादरा व नगर हवेली आणि दीव व दमण या केंद्रशासित प्रदेशांचे विलीनीकरण' विधेयक डिसेंबर २०१९ मध्ये मंजूर झाले व त्यांची अंमलबजावणी २६ जानेवारी २०२० पासून करण्यात आली.**]** **(स्रोत:***https://knowindia.gov.in/states-uts/)*

Sample Content

### प्र.१.(अ) अचूक पर्याय निवडून विधाने पुन्हा लिहा.

१. ब्राझील देश ________ या नृत्यप्रकारासाठी प्रसिद्ध आहे. **[डिसेंबर २०२०]**

अ. सांबा  ब. बिहू
क. भांगडा  ड. भरतनाट्यम

२. भारताचे स्थान पृथ्वीवर ____________ गोलार्धात आहे. **[मार्च २०२२]**

अ. उत्तर व पूर्व  ब. दक्षिण व पश्चिम
क. उत्तर व पश्चिम  ड. दक्षिण व पूर्व

*३. भारताचे सर्वांत दक्षिणेकडील टोक ________ नावाने ओळखले जाते.

अ. लक्षद्वीप  ब. कन्याकुमारी
क. इंदिरा पॉईंट  ड. पोर्ट ब्लेअर

४. ________ हे ठिकाण ६°४५' उ. अक्षवृत्तावर आहे.

अ. लक्षद्वीप  ब. कन्याकुमारी
क. इंदिरा पॉईंट  ड. पोर्ट ब्लेअर

५. तीन शतकांपेक्षा अधिक काळ ब्राझील ________ अधिपत्याखाली होता.

अ. इंग्रजांच्या  ब. पोर्तुगिजांच्या
क. डचांच्या  ड. फ्रेंचांच्या


*६. दोन्ही देशांतील राजवट ________ प्रकारची आहे.


अ. लष्करी  ब. साम्यवादी
क. प्रजासत्ताक  ड. अध्यक्षीय


*७. गोलार्धांचा विचार करता खालील पयार्यांपैकी भारत कोणत्या गोलार्धात आहे?

अ.





ब.




क.



ड.



*८. गोलार्धांचा विचार करता ब्राझील प्रामुख्याने खालीलपैकी कोणत्या गोलार्धात आहे?

अ.




ब.




क.




ड.




*९. खालीलपैकी कोणता आकार भारताचा किनारी भाग योग्यप्रकारे दर्शवतो?


अ.




ब.




क.




ड.



*१०. खालीलपैकी कोणता आकार ब्राझीलचा किनारी भाग योग्यप्रकारे दर्शवतो?

अ.



ब.



क.






ड.




*११. दक्षिण अमेरिका खंडातील हे दोन देश ब्राझीलच्या सीमेलगत नाहीत.

अ. चिली-इक्वेडोर
ब. अर्जेंटिना-बोलिव्हिया
क. कोलंबिया-फ्रेंच गियाना
ड. सुरीनाम-उरुग्वे

१२. ब्राझील या देशाकडे भविष्यातील एक ________ या दृष्टीने पहिले जाते.

अ. जागतिक अर्थसत्ता  ब. प्रमुख बाजारपेठ
क. तरुण देश  ड. वरीलपैकी नाही.

**उत्तर:** १. सांबा
२. उत्तर व पूर्व
३. इंदिरा पॉईंट
४. इदिरा पॉईंट
५. पोर्तुगिजांच्या
६. प्रजासत्ताक
७. उ.

८.

द.
९.


१०.


११. चिली-इक्वेडोर
१२. प्रमुख बाजारपेठ

### प्र.१.(आ) अचूक सहसंबंध ओळखा व साखळी बनवा.

| | 'अ' गट | | 'ब' गट | | 'क' गट |
|---|---|---|---|---|---|
| १. | भारत | i. | उत्तर अटलांटिक महासागर | अ. | दक्षिण अटलांटिक महासागर |
| २. | ब्राझील | ii. | उत्तर गोलार्ध | ब. | मकरवृत्त |
| ३. | भारतीय किनारा | iii. | दक्षिण गोलार्ध | क. | कर्कवृत्त |
| ४. | ब्राझील किनारा | iv. | अरबी समुद्र | ड. | लक्षद्वीप बेटे |

**उत्तर:**

| | 'अ' गट | | 'ब' गट | | 'क' गट |
|---|---|---|---|---|---|
| १. | भारत | ii. | उत्तर गोलार्ध | क. | कर्कवृत्त |
| २. | ब्राझील | iii. | दक्षिण गोलार्ध | ब. | मकरवृत्त |
| ३. | भारतीय किनारा | iv. | अरबी समुद्र | ड. | लक्षद्वीप बेटे |
| ४. | ब्राझील किनारा | i. | उत्तर अटलांटिक महासागर | अ. | दक्षिण अटलांटिक महासागर |

### प्र.१.(इ) परस्परसंबंध शोधून लिहा.

१. लोकप्रिय खेळ –
भारत : क्रिकेट :: ब्राझील : ________

२. राजधानीचे शहर –
भारत : ________ :: ब्राझील : ब्राझीलिया

३. खंडानुसार स्थान –
भारत : ________ :: ब्राझील : दक्षिण अमेरिका

४. स्वातंत्र्याचे वर्ष –
भारत : १९४७ :: ब्राझील : ________

**उत्तर:** १. फुटबॉल २. नवी दिल्ली
३. आशिया ४. १८२२

### प्र.२.(अ) योग्य जोड्या जुळवा.

१.

| | गट 'अ' (दिशा) | | गट 'ब' (भारताशेजारील देश) |
|---|---|---|---|
| i. | उत्तर | अ. | पाकिस्तान |
| ii. | पूर्व | ब. | श्रीलंका |
| iii. | दक्षिण | क. | चीन |
| iv. | पश्चिम | ड. | उरुग्वे |
| | | इ. | बांग्लादेश |

**उत्तर:** (i – क), (ii – इ), (iii – ब), (iv – अ)

२.

| | गट 'अ' (दिशा) | | गट 'ब' (ब्राझीलच्या शेजारील देश व महासागर) |
|---|---|---|---|
| i. | उत्तर | अ. | दक्षिण अटलांटिक महासागर |
| ii. | पूर्व | ब. | बोलिव्हिया |
| iii. | दक्षिण | क. | ऑस्ट्रेलिया |
| iv. | पश्चिम | ड. | गियाना |
| | | इ. | अर्जेंटिना |

**उत्तर:** (i – ड), (ii – अ), (iii – इ), (iv – ब)

### प्र.२.(आ) तक्ता पूर्ण करा.

**१. नकाशाशी मैत्री!**

**i. पाठ्यपुस्तकातील आकृती २.१ नकाशाचे निरीक्षण करा व भारताच्या शेजारचे देश व सीमेवरील जलाशयांची नावे तक्त्याच्या आधारे वहीत लिहा.**

(पाठ्यपुस्तक पृष्ठ क्र. १०/११)

| दिशा | शेजारचे देश / सागर / महासागर |
|---|---|
| पूर्व | |
| उत्तर | |
| पश्चिम | |
| दक्षिण | |

Sample Content

उत्तर:

| दिशा | शेजारचे देश / सागर / महासागर |
|---|---|
| पूर्व | बांग्लादेश, म्यानमार , बंगालचा उपसागर |
| उत्तर | अफगाणिस्तान, चीन, नेपाळ, भूतान |
| पश्चिम | पाकिस्तान, अरबी समुद्र |
| दक्षिण | श्रीलंका, इंडोनेशिया, हिंदी महासागर |

**ii. पाठ्यपुस्तकातील आकृती २.२ नकाशाचे निरीक्षण करा. ब्राझीलच्या शेजारील देश व महासागर शोधा. ब्राझीलच्या संदर्भात या देशांची व महासागरांची नावे योग्य स्थानी तक्त्याच्या आधारे वहीत लिहा.**

(पाठ्यपुस्तक पृष्ठ क्र. ११)

| दिशा | शेजारचे देश / महासागर |
|---|---|
| उत्तर | |
| पश्चिम | |
| दक्षिण | |
| पूर्व | |

उत्तर:

| दिशा | शेजारचे देश / महासागर |
|---|---|
| उत्तर | फ्रेंच गियाना, सुरीनाम, गियाना, व्हेनेझुएला, उत्तर अटलांटिक महासागर |
| पश्चिम | कोलंबिया , पेरू, बोलिव्हिया, पॅराग्वे |
| दक्षिण | अर्जेंटिना, उरुग्वे, दक्षिण अटलांटिक महासागर |
| पूर्व | दक्षिण अटलांटिक महासागर |

## प्र.२.(इ) वेगळा घटक ओळखा.

**१. भारतातील राज्ये –** **[मार्च२०१९]**

i. मध्य प्रदेश ii. महाराष्ट्र
iii. मेघालय iv. मारान्हाओ

**२. भारताचे शेजारील देश –**

i. पाकिस्तान ii. इंडोनेशिया
iii. उरुग्वे iv. श्रीलंका

**३. ब्राझीलचे शेजारील देश –**

i. पेरू ii. कोलंबिया
iii. श्रीलंका iv. व्हेनेझुएला

**४. भारतालगतचे जलाशय –**

i. उत्तर अटलांटिक महासागर
ii. बंगालचा उपसागर
iii. अरबी समुद्र
iv. हिंदी महासागर

**५. ब्राझीलच्या सीमेलगतचे दक्षिण अमेरिका खंडातील देश –**

i. अर्जेंटिना ii. इक्वेडोर
iii. सुरीनाम iv. व्हेनेझुएला

उत्तर:

१. मारान्हाओ २. उरुग्वे
३. श्रीलंका
४. उत्तर अटलांटिक महासागर ५. इक्वेडोर

## प्र.३.(अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.

**१. ब्राझीलमधील लोकप्रिय खेळ कोणता? [मार्च २०२२]**

**उत्तर:** फुटबॉल हा ब्राझीलमधील सर्वांत लोकप्रिय खेळ आहे.

**२. भारतातील क्षेत्रफळाच्या दृष्टीने सर्वांत मोठे राज्य कोणते? [मार्च २०२२]**

**उत्तर:** राजस्थान हे राज्य क्षेत्रफळाच्या दृष्टीने सर्वांत मोठे राज्य आहे.

**४. भारताला कोणत्या महासागराचे सान्निध्य लाभले आहे?**

**उत्तर:** भारताच्या दक्षिणेला हिंदी महासागराचे सान्निध्य लाभले आहे.

**५. ब्राझील हा देश प्रामुख्याने कोणत्या गोलार्धात आहे? [डिसेंबर २०२०]**

**उत्तर:** ब्राझील हा देश प्रामुख्याने दक्षिण गोलार्धात आहे.

## प्र.३.(आ) नावे लिहा.

**१. भारताचा स्वातंत्र्यदिन**

**उत्तर:** १५ ऑगस्ट १९४७

**२. ब्राझीलचा स्वातंत्र्यदिन**

**उत्तर:** ७ सप्टेंबर १८२२

**३. १९३० पासून १९८५ पर्यंतच्या काळातील ब्राझीलमधील राजवट**

**उत्तर:** लोकप्रिय लष्करी राजवट

**४. ब्राझील देशाचे नाव या स्थानिक वृक्षाच्या नावावरून पडले आहे.**

**उत्तर:** पाऊ ब्रासील



Sample Content

५. **भारतातील वर्तमान शासनप्रणाली प्रकार**
**उत्तर:** संसदीय प्रजासत्ताक शासनप्रणाली

**प्र.३.(इ) चूक की बरोबर ते लिहा व चुकीची विधाने दुरुस्त करून लिहा.**

*१. **ब्राझील हा देश प्रामुख्याने दक्षिण गोलार्धात आहे.** [मार्च २०१९]
**उत्तर:** बरोबर

*२. **भारताच्या मध्यातून मकरवृत्त गेले आहे.**
**उत्तर:** चूक
भारताच्या मध्यातून कर्कवृत्त गेले आहे.

*३. **ब्राझीलचा रेखावृत्तीय विस्तार भारतापेक्षा कमी आहे.**
**उत्तर:** चूक
ब्राझीलचा रेखावृत्तीय विस्तार भारतापेक्षा जास्त आहे.

*४. **ब्राझील देशाच्या उत्तर भागातून विषुववृत्त जाते.**
**उत्तर:** बरोबर

*५. **ब्राझील देशाला पॅसिफिक महासागराचा किनारा लाभला आहे.**
**उत्तर:** चूक
ब्राझील देशाला उत्तर अटलांटिक महासागर आणि दक्षिण अटलांटिक महासागर यांचा किनारा लाभला आहे.

*६. **भारताच्या आग्नेयेस पाकिस्तान हे राष्ट्र आहे.**
**उत्तर:** चूक
भारताच्या वायव्येस पाकिस्तान हे राष्ट्र आहे.

*७. **भारताच्या दक्षिण भूभागास द्वीपकल्प म्हणतात.**
**उत्तर:** बरोबर

८. **ब्राझीलला 'जगाचा कॉफी पॉट' असे संबोधले जाते.**
**उत्तर:** बरोबर

९. **ब्राझील हा मसाल्याच्या पदार्थांकरता जगप्रसिद्ध आहे.**
**उत्तर:** चूक
भारत हा मसाल्याच्या पदार्थांकरता जगप्रसिद्ध आहे.

१०. **चीन हा जागतिक लोकसंख्येत दुसऱ्या क्रमांकावरील देश आहे.**
**उत्तर:** चूक
भारत हा जागतिक लोकसंख्येत दुसऱ्या क्रमांकावरील देश आहे.

११. **भारताकडे तरुण देश म्हणून पाहिले जाते.**
**उत्तर:** बरोबर

१२. **भारताच्या लोकसंख्येमध्ये अकार्यशील वयोगटाचे प्रमाण अधिक आहे.**
**उत्तर:** चूक
भारताच्या लोकसंख्येमध्ये कार्यशील वयोगटाचे प्रमाण अधिक आहे.

**प्र.३.(ई) फरक स्पष्ट करा.**

१. **पाहा बरे जमते का?** (पाठ्यपुस्तक पृष्ठ क्र. १३)
**भारत आणि ब्राझील या दोन्ही देशांतील स्वातंत्र्योत्तरकाळातील फरक शोधा.**
**उत्तर:** भारत आणि ब्राझील या दोन्ही देशांतील स्वातंत्र्योत्तरकाळातील फरक पुढील तक्त्यात मांडला आहे.

| क्र. | स्वातंत्र्योत्तरकाळातील भारत | स्वातंत्र्योत्तरकाळातील ब्राझील |
|---|---|---|
| i. | १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वातंत्र्य मिळाल्यानंतर अल्प काळातच भारतात प्रजासत्ताक शासनप्रणालीची स्थापना करण्यात आली. | १८२२ मध्ये ब्राझीलला स्वातंत्र्य मिळाले; मात्र १९३० ते १९८५ या कालावधीत हा देश लोकप्रिय लष्करी राजवटीखाली होता. |
| ii. | भारतीय संघराज्यात संसदीय प्रजासत्ताक शासनप्रणाली आहे. | ब्राझील संघराज्यात राष्ट्रपती नियंत्रित प्रजासत्ताक शासनप्रणाली आहे. |
| iii. | भारतामध्ये वाहतुकीसाठी रस्ते व लोहमार्गांचा मोठ्या प्रमाणावर विकास झाला असून देशभर रस्ते व लोहमार्गांचे जाळे पसरले आहे. | प्राकृतिक मर्यादा लक्षात घेता ब्राझीलमध्ये लोहमार्गांचा जास्त विकास झालेला नाही. पूर्व किनारपट्टीजवळील भागात लोहमार्ग व रस्ते यांचे जाळे आहे. |
| iv. | भारताच्या लोकसंख्येमध्ये तरुणांचे प्रमाण जास्त असल्याने देशात कार्यशील मनुष्यबळ अधिक प्रमाणात आहे. | ब्राझीलच्या लोकसंख्येमध्ये वृद्धांचे प्रमाण अधिक आहे. |

## प्र.४.(अ) दिलेल्या नकाशा आराखड्यामध्ये माहिती भरा व सूची तयार करा.

**१. नकाशाशी मैत्री** (पाठ्यपुस्तक पृष्ठ क्र. १२)

जगाच्या आराखड्यामध्ये पुढील घटक दाखवा.


i. सर्व खंड व महासागरांना नावे द्या.

ii. ब्राझील व भारत हे देश वेगवेगळ्या रंगाने रंगवा व नावे द्या.

iii. नकाशावर विषुववृत्त दाखवा व त्यांचे अंशात्मक मूल्य लिहा.

iv. दिशादर्शक दाखवा.

**उत्तर:**





**सूची**

| प्र. क्र. | सांकेतिक चिन्हे | सविस्तर माहिती | गुण |
|---|---|---|---|
| i. | , | खंड व महासागर | |
| ii. | , | भारत व ब्राझील | |
| iii. | — | विषुववृत्त | |
| iv. | ↑ | दिशादर्शक | |

Sample Content

२. i. भारताचे सर्वांत दक्षिणेकडील टोक
ii. भारताची राजधानी
iii. अंदमान व निकोबार बेटे
iv. कर्कवृत्त **[मार्च २०२२]**
v. भारताचे सर्वांत दक्षिणेकडील राज्य
vi. सिक्कीम **[मार्च २०२२]**
vii. भारताचे शेजारील देश – पाकिस्तान, भूतान, नेपाळ, म्यानमार, श्रीलंका, चीन, बांग्लादेश

**उत्तर:**





**सूची**

| प्र. क्र. | सांकेतिक चिन्हे | सविस्तर माहिती | गुण |
|---|---|---|---|
| i. | ● | भारताचे सर्वांत दक्षिणेकडील टोक - इंदिरा पॉईंट | |
| ii. | ◉ | भारताची राजधानी - नवी दिल्ली | |
| iii. | ■ | अंदमान व निकोबार बेटे | |
| iv. | ----- | कर्कवृत्त | |
| v. | ☰ | भारताचे सर्वांत दक्षिणेकडील राज्य - तमिळनाडू | |
| vi. | ■ | सिक्कीम | |
| vii. | ▥ | भारताचे शेजारील देश | |

३. i. ब्राझीलची राजधानी
ii. विषुववृत्त
iii. मकरवृत्त
iv. उत्तर अटलांटिक महासागर
v. ब्राझीलचा उत्तरेकडील शेजारील एक देश
vi. ब्राझीलच्या दक्षिणेकडील शेजारील एक देश

**उत्तर:**




**सूची**

| प्र. क्र. | सांकेतिक चिन्हे | सविस्तर माहिती | गुण |
|---|---|---|---|
| i. | ◉ | ब्राझीलची राजधानी | |
| ii. | —— | विषुववृत्त | |
| iii. | ........ | मकरवृत्त | |
| iv. | ⩘⩘⩘ | उत्तर अटलांटिक महासागर | |
| v. | गियाना | ब्राझीलचा उत्तरेकडील शेजारील एक देश | |
| vi. | उरुग्वे | ब्राझीलचा दक्षिणेकडील शेजारील एक देश | |

[**टीप:** विद्यार्थी ब्राझीलचे उत्तर व दक्षिणेकडील इतर शेजारील देशही नकाशा आराखड्यामध्ये दाखवू शकतात.]

**प्र.४.(आ) दिलेल्या नकाशाचे वाचन करून त्याखालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

१. **द्वैतांचे रंग** (पाठ्यपुस्तक पृष्ठ क्र. १२)

**तुम्ही अभ्यासलेल्या देशांच्या संदर्भात खालील प्रश्नांची उत्तरे शोधा आणि लिहा.** (प्रश्न क्र. ४.अ. १. मधील नकाशा पाहा.)

**i. जगाच्या नकाशात तुम्ही रंगवलेल्या देशांपैकी कोणता देश आकारमानाने मोठा आहे?**

**उत्तर:** ब्राझील हा देश आकारमानाने मोठा आहे.

**ii. कोणत्या देशाचा अक्षवृत्तीय विस्तार जास्त आहे?**

**उत्तर:** ब्राझीलचा अक्षवृत्तीय विस्तार भारतापेक्षा जास्त आहे.

**iii. ब्राझील आणि भारत या देशांचे स्थान खंडांच्या संदर्भात कसे वेगळे आहे ते सांगा.**

**उत्तर:** ब्राझील या देशाचे स्थान दक्षिण अमेरिका खंडाच्या उत्तरेला आहे, तर भारताचे स्थान आशिया खंडाच्या दक्षिणेला आहे.

**iv. या दोन्ही देशांमध्ये प्रत्येकी किती राज्ये आहेत?**

**उत्तर:** भारतामध्ये २८ राज्ये आणि ८ केंद्रशासित प्रदेश आहेत. ब्राझीलमध्ये २६ राज्ये आणि १ सांघिक जिल्हा (फेडरल डिस्ट्रिक्ट) आहे.

[**स्रोत:** *https://knowindia.gov.in/states-uts/*]

Sample Content

**२. नकाशाशी मैत्री** (पाठ्यपुस्तक पृष्ठ क्र. १०)
**पाठ्यपुस्तकातील आकृती २.१ च्या साहाय्याने भारताच्या मुख्य भूमीचा विस्तार शोधा. अंशाचे मूल्य गाळलेल्या जागांमध्ये लिहा.**

**उत्तर:** ८° ४′ उ. ते ३७° ६′ उ. अक्षवृत्त आणि ६८° ७′ पू. ते ९७° २५′ पू. रेखावृत्त आहे.

**३. नकाशाशी मैत्री** (पाठ्यपुस्तक पृष्ठ क्र. ११)
**पाठ्यपुस्तकातील आकृती २.२ च्या साहाय्याने ब्राझीलच्या मुख्य भूमीच्या विस्ताराचे अंशमूल्य शोधा व गाळलेल्या जागेत भरा.**

**उत्तर:** ५° १५′ उ. ते ३३° ४५′ द. अक्षवृत्त आणि ३४° ४५′ प. ते ७३° ४८′ प. रेखावृत्त आहे.

## प्र.५. भौगोलिक कारणे लिहा.

**१. ब्राझीलला 'जगाचा कॉफी पॉट' असे संबोधले जाते.**
**उत्तर:**
i. ब्राझीलचा आग्नेयेकडील प्रदेश शेतीच्या दृष्टीने अनुकूल हवामान व सुपीक जमिनीचा आहे.
ii. या सुयोग्य स्थितीमुळे या प्रदेशात व्यावसायिकदृष्ट्या कॉफीचे उत्पादन मोठ्या प्रमाणात घेतले जाते.
उदा. सावो पावलो व मिनास झिराइस हे प्रमुख कॉफी उत्पादक प्रदेश आहेत.
iii. ब्राझील हा कॉफीच्या निर्यातीत अग्रेसर देश आहे.
म्हणूनच, ब्राझीलला 'जगाचा कॉफी पॉट' असे संबोधले जाते.

## प्र.६. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

**१. भारत आणि ब्राझील या देशांमधील समान मुद्दे कोणते आहेत?**
**उत्तर:** भारत आणि ब्राझील या देशांमधील समान मुद्दे पुढीलप्रमाणे आहेत.
i. भारत आणि ब्राझील या दोन्ही देशांवर प्रदीर्घ काळ परकीय राजवटीचा अंमल होता.
ii. दोन्ही देशांमध्ये सध्या प्रजासत्ताक शासनप्रणाली आहे.
iii. दोन्ही देशांना स्वातंत्र्य मिळाल्यानंतर काही समस्यांना तोंड द्यावे लागले आहे.
iv. दोन्ही देशांकडे जगातील प्रमुख बाजारपेठा म्हणून पाहिले जाते.
v. दोन्ही देशांना विस्तृत सागरकिनारा लाभला आहे.
vi. दोन्ही देशांच्या क्षेत्रफळाचा विचार करता आकाराच्या दृष्टीने जगातील पहिल्या दहा देशांमध्ये या देशांचा क्रमांक (ब्राझील - ५ वा क्रमांक, भारत - ७ वा क्रमांक) लागतो.

***२. भारत आणि ब्राझील या दोन्ही देशांत स्थानासंदर्भातील कोणत्या बाबी वेगळ्या आहेत?**
**[मार्च२०१९]**

**उत्तर:** गोलार्ध व खंड या बाबींसंदर्भात भारत आणि ब्राझील या दोन्ही देशांच्या स्थानात वेगळेपण आहे, ते पुढीलप्रमाणे:
**i. गोलार्धांसंदर्भातील स्थान:**
अ. भारत उत्तर गोलार्धात आहे, तर ब्राझीलचा काही भाग उत्तर गोलार्धात व बहुतांशी भाग हा दक्षिण गोलार्धात आहे.
ब. भारत पूर्व गोलार्धात आहे, तर ब्राझील पश्चिम गोलार्धात आहे.
**ii. खंडांसंदर्भातील स्थान:**
अ. भारत आशिया खंडात आहे, तर ब्राझील दक्षिण अमेरिका खंडात आहे.
ब. भारताचे स्थान आशिया खंडात दक्षिणेला आहे, तर ब्राझीलचे स्थान दक्षिण अमेरिका खंडाच्या उत्तरेला आहे.

***३. भारत व ब्राझील यांचा अक्षवृत्तीय व रेखावृत्तीय विस्तार सांगा.**
**उत्तर:**
i. भारत व ब्राझील यांचा अक्षवृत्तीय व रेखावृत्तीय विस्तार पुढीलप्रमाणे:

| | |
|---|---|
| **भारताचा अक्षवृत्तीय विस्तार** | ८° ४′ उ. ते ३७° ६′ उ. अक्षवृत्त |
| **भारताचा रेखावृत्तीय विस्तार** | ६८° ७′ पू. ते ९७° २५′ पू. रेखावृत्त |
| **ब्राझीलचा अक्षवृत्तीय विस्तार** | ५° १५′ उ. ते ३३° ४५′ द. अक्षवृत्त |
| **ब्राझीलचा रेखावृत्तीय विस्तार** | ३४° ४५′ प. ते ७३° ४८′ प. रेखावृत्त |

ii. इंदिरा पॉईंट हे भारताचे सर्वांत दक्षिणेकडील टोक असून हे ठिकाण ६° ४५′ उ. अक्षवृत्तावर आहे.

**४. भारत व ब्राझीलचे स्थान व विस्तार या संदर्भाने तुलनात्मक माहिती लिहा.**
**उत्तर:**
**i.** भारत आणि ब्राझील या दोन्ही देशांच्या स्थानातील वेगळेपण पुढीलप्रमाणे:
**अ. गोलार्धांसंदर्भातील स्थान:** भारताचे स्थान पूर्व आणि उत्तर गोलार्धात आहे, तर ब्राझील पश्चिम गोलार्धात असून ब्राझीलचा काही भाग उत्तर गोलार्धात व बहुतांशी भाग दक्षिण गोलार्धात आहे.

Sample Content

**ब.** **खंडासंदर्भातील स्थान:** भारत आशिया खंडाच्या दक्षिण भागात आहे, तर ब्राझील दक्षिण अमेरिका खंडाच्या उत्तर भागात आहे.

**ii.** **दोन्ही देशांचा विस्तार पुढीलप्रमाणे:**

**अ.** **अक्षवृत्तीय विस्तार:** भारताचा अक्षवृत्तीय विस्तार ८°४' उ ते ३७°६' उ अक्षवृत्त इतका आहे, तर ब्राझीलचा अक्षवृत्तीय विस्तार ५°१५' उ ते ३३°४५' द अक्षवृत्त इतका आहे.

**ब.** **रेखावृत्तीय विस्तार:** भारताचा रेखावृत्तीय विस्तार ६८°७' पू ते ९७°२५' पू रेखावृत्त इतका आहे, तर ब्राझीलचा रेखावृत्तीय विस्तार ३४°४५' प ते ७३°४८' प रेखावृत्त इतका आहे.

***५.** **स्वातंत्र्योत्तरकाळात भारत आणि ब्राझील या देशांना कोणत्या समस्यांना तोंड द्यावे लागले?**

**उत्तर:**

i. भारत सुमारे दीड शतकाच्या कालखंडात ब्रिटिशांच्या अधिपत्याखाली होता. १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत स्वतंत्र झाला. स्वातंत्र्योत्तरकाळात भारताने पुढील समस्यांना तोंड दिले.

अ. स्वातंत्र्योत्तरकाळात भारताला तीन युद्धांना सामोरे जावे लागले.

ब. त्याचबरोबर देशातील अनेक भागांमध्ये दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली होती.

परंतु, विविध टप्प्यांवर झालेल्या आर्थिक सुधारणांमुळे आर्थिक विकासाला वेग आला आणि आज भारत हा जगातील एक प्रमुख विकसनशील देश आहे.

ii. ब्राझील हा देश तीन शतकांहून अधिक काळ पोर्तुगिजांच्या अधिपत्याखाली होता. १८२२ मध्ये ब्राझीलला स्वातंत्र्य मिळाले. १९३० ते १९४५ पर्यंत हा देश लष्करी राजवटीखाली होता.

स्वातंत्र्योत्तरकाळात ब्राझीलला जागतिक वित्तीय समस्यांना सामोरे जावे लागले असून विसाव्या शतकाच्या शेवटच्या कालखंडात जागतिक वित्तीय समस्यांमधून हा देश सावरला आहे.

**६.** **भारताच्या ऐतिहासिक पार्श्वभूमीचे थोडक्यात वर्णन करा.** **[डिसेंबर २०२०]**

**उत्तर:** या उत्तराकरता प्र. ६ 'खालील प्रश्नांची उत्तरे लिहा' मधील क्र. ५ – i मुद्दा अभ्यासा.

## ज्ञानाचे उपयोजन करा.

**१.** **पाठातील प्रश्न** (पाठ्यपुस्तक पृष्ठ क्र. ९)

**पुढे दोन देशांचे ध्वज व काही सूचक विधाने दिली आहेत. त्यांचा वापर करा. त्या आधारे हे देश कोणते ते ओळखा.**

**उत्तर:** पाठ्यपुस्तक पृष्ठ क्रमांक ९ वर दिलेल्या माहितीनुसार पहिला देश भारत असून दुसरा देश ब्राझील आहे.

**२.** **द्वैतांचे रंग** (पाठ्यपुस्तक पृष्ठ क्र. १२)

**i.** **तुमच्या वहीत या देशांचे ध्वज काढा.**

(विद्यार्थ्यांनी हा उपक्रम स्वत: करणे अपेक्षित आहे.)

**ii.** **दोन्ही देशांच्या बोधचिन्हांविषयी माहिती घ्या.**

[**टीप:** वरील प्रश्नांच्या उत्तराकरता शेजारील Q. R. Code *Quill - The Padhai App* द्वारे स्कॅन करावा.]

**३.** **पाहा बरे जमते का?** (पाठ्यपुस्तक पृष्ठ क्र. १३)

**ज्या परकीय सत्तेने ब्राझीलवर राज्य केले होते त्या सत्तेचे राज्य भारतात कोठे होते? तो प्रदेश या सत्तेपासून कधी मुक्त झाला ते शोधा.**

**उत्तर:**

i. पोर्तुगीज या परकीय सत्तेने १६ व्या ते १९ व्या शतकांदरम्यान ब्राझीलवर राज्य केले.

ii. पोर्तुगिजांनी भारतातील दादरा आणि नगर हवेली, दीव-दमण आणि गोवा या प्रदेशांवर राज्य केले.

iii. यापैकी दादरा-नगर हवेली हा भाग पोर्तुगिजांच्या अंमलाखालून १९५४ साली मुक्त झाला आणि ऑगस्ट १९६१ मध्ये तो भारतीय संघराज्यात समाविष्ट झाला.

iv. दीव-दमण आणि गोवा हे प्रदेश भारतीय सैन्याने १९ डिसेंबर १९६१ रोजी पोर्तुगीज सत्तेपासून मुक्त करून भारतात समाविष्ट केले.

v. दादरा-नगर हवेली आणि दीव व दमण या प्रदेशांना भारतीय संघराज्यात केंद्रशासित प्रदेशाचा दर्जा देण्यात आला आहे. सुरुवातीला गोवा, दीव आणि दमण या प्रदेशांचा मिळून एक केंद्रशासित प्रदेश होता. ३० मे १९८६ रोजी गोवा हे भारतातील २५ वे राज्य बनले, तर दीव आणि दमणचा केंद्रशासित प्रदेशाचा दर्जा कायम राहिला.

**[स्रोत:**

अ. *www.goa.gov.in*

ब. *www.britannica.com/place/Dadra-and-Nagar-Haveli*]

Sample Content

# AVAILABLE NOTES FOR STD. X:
(Eng., Mar. & Semi Eng. Med.)

## PERFECT SERIES
- English Kumarbharati
- मराठी अक्षरभारती
- हिंदी लोकभारती
- हिंदी लोकवाणी
- आमोद: सम्पूर्ण-संस्कृतम्
- आनन्द: संयुक्त-संस्कृतम्
- History and Political Science
- Geography
- Mathematics (Part - I)
- Mathematics (Part - II)
- Science and Technology (Part - 1)
- Science and Technology (Part - 2)

## PRECISE SERIES
- Science and Technology (Part - 1)
- Science and Technology (Part - 2)
- History, Political Science and Geography

## PRECISE SERIES
- My English Coursebook
- मराठी कुमारभारती
- इतिहास व राज्यशास्त्र
- भूगोल
- गणित (भाग - I)
- गणित (भाग - II)
- विज्ञान आणि तंत्रज्ञान (भाग - १)
- विज्ञान आणि तंत्रज्ञान (भाग - २)

## WORKBOOK
- English Kumarbharati
- मराठी अक्षरभारती
- हिंदी लोकभारती
- My English Coursebook
- मराठी कुमारभारती

## Additional Titles: (Eng., Mar. & Semi Eng. Med.)
- Grammar & Writing Skills Books (Std. X)
  • Marathi • Hindi • English
- Hindi Grammar Worksheets
- SSC 54 Question Papers & Activity Sheets With Solutions
- आमोद:(सम्पूर्ण-संस्कृतम्)
  SSC 11 Activity Sheets With Solutions
- हिंदी लोकवाणी (संयुक्त), संस्कृत-आनन्द: (संयुक्तम्)
  SSC 12 Activity Sheets With Solutions
- IQB (Important Question Bank)
- Mathematics Challenging Questions
- Geography Map & Graph Practice Book
- A Collection of Board Questions With Solutions




Scan the QR code to buy e-book version of Target's Notes on Quill - The Padhai App




Explore our range of STATIONERY

Marketed by:

Target Publications® Pvt. Ltd.
Transforming lives through learning.

Visit Our Website

Address: 2nd floor, Aroto Industrial Premises CHS, Above Surya Eye Hospital, 63-A, P. K. Road, Mulund (W), Mumbai 400 080
Tel: 88799 39712 / 13 / 14 / 15 • Website: www.targetpublications.org • Email: mail@targetpublications.org